# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** लातूर **P.S.(ठाणे):** रेणापूर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0176 **Year (वर्ष):** 2025

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**20/05/2025 19:29

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** मंगलवार **Date From (दिनांक पासून):** 20/05/2025
**Time Period (कालावधी):** पहर 4 **Date To ( दिनांक पर्यंत):** 20/05/2025
**Time From (वेळेपासून):** 11:22 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 11:22 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 20/05/2025 **Time (वेळ):** 19:13 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 016
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 20/05/2025 19:13 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पश्चिम, 2 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** पंचायतसमिती कार्यालचे कँटीनमध,रेणापूर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** ओमप्रकाश अण्णासाहेब सोमवंशी

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1994

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | चाडगाव ,रेणापूर ,लातूर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | चाडगाव ,रेणापूर ,लातूर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9370499089

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | ज्योतिर्लिंग बाबुराव चिखले | | | 1. अग्रोया नगर,स्वामी समर्थ मंदीर, जवळ,लातूर,रेणापूर ,लातूर, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500/रुपये दराच्या 24 भारतीय चलनी नोटा असे एकुण 12,000 | 12,000.00 |

| **S.No.** (अ.क्र.) | **Property Category** (मालमत्ता वर्ग) | **Property Type** (मालमत्ता प्रकार) | **Description** (वर्णन) | **Value(In Rs/-)** (मुल्य (रू. /रुपये |
|---|---|---|---|---|
| | | | | |

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

12,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| **S.No.** (अ.क्र.) | **UIDB Number** (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद दिनांक 20/05/2025

मी ओमप्रकाश अण्णासाहेब सोमवंशी वय 31 वर्षे व्यवसाय शेती रा.चाडगाव, ता.रेणापूर, जि.लातूर मो.नं. 9370499089, आधार कार्ड नं.4636 7298 4864 असा आहे.

समक्ष फिर्याद देतो की, मी वरील ठिकाणचा राहणारा असुन शेती करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतो. मी दिनांक 08/05/2025 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर येथे पोलीस उपअधीक्षक श्री संतोश बर्गे साहेब यांच्या कार्यालयात जावून त्यांची भेट घेवून एका लोकसेवकाविरुध्द लाच मागणीची माझी तक्रार असल्याचे तोंडी सांगितले होते. त्यांनी मला दिनांक 09/05/2025 रोजी 09.00 वा. श्री. दत्त साधकाश्रम ध्यान मंदीर,रेणापूर फाटा येथे सापळा कार्यवाही करण्याचे अनुशंगाने येण्यास सांगीतले होते.

त्याप्रमाणे मी दिनांक 09/05/2025 रोजी सकाळी 09.00 वा. सुमारास वरीलप्रमाणे सांगितलेल्या ठिकाणी हजर आलो. तेथे पोलीस उपअधीक्षक संतोश बर्गे साहेब हे खाजगी वाहनाने त्यांचे कर्मचारी व दोन पंचासह हजर होते. त्यांनी मला सापळा पथकातील सदस्य व पंचांची ओळख करून देवुन त्यांचेसमक्ष माझे नाव, गाव विचारले असता मी त्यांना माझे नाव वरीलप्रमाणे सांगुन माझी तोंडी तक्रार सांगुन सविस्तर लेखी तक्रार दिली, ती खालीलप्रमाणे.

"मी वरील ठिकाणचा राहणारा असुन षेती करून कुटूंबाची उपजिवीका भागवतो. माझे वडीलांचे नावे मौजे चाडगाव,ता.रेणापूर येथील गट नं. 170 मध्ये 0.42 आर षेती असुन सदर षेतीमध्ये मी वडीलांच्या नावे महात्मा गांधी राश्ट्रीय ग्रामिण रोजगार हमी योजने अंतर्गत अहिल्यादेवी सिंचन विहीर घेण्यासाठी दिनांक 05/03/2024 रोजी प्रस्ताव दाखल केलेला आहे. त्याचे इस्टिमेट चार लाखाचे होते परंतू दिनांक 01/04/2025 पासून मजूरी दर वाढल्याने नविन दरानुसार विहीरीचे इस्टिमेट पाच लाखाचे झाले आहे. त्यावरून नविन दरानुसार विहीरीचे इस्टिमेट वाढवून देण्याचे कामासाठी तसेच नरेगा साईटवर माझे वडीलांचे आडनावामध्ये सोमवंशी ऐवजी सुर्यवंशी असे चुकीचे नाव झालेले असुन त्यामध्ये दूरूस्ती करण्यासाठी मी मा.गटविकास अधिकारी,पंचायत समिती,रेणापूर,जि. लातूर यांना दिनांक 06/05/2025 रोजी लेखी अर्ज दिला आहे.

सदर कामासाठी मी दिनांक 06/05/2025 रोजी संबंधीत कर्मचारी चिखले यांना भेटलो असता त्यांनी मला माझे वरील नमूद कामासाठी 15,000/-रूपये लाचेची मागणी केली आहे. संबंधीत कर्मचारी चिखले यांना लाच दिली नाहीतर ते माझे काम करणार नाहीत या भितीपोटी मी त्यांना होकार देवून स्वमर्जीने तक्रार देण्यासाठी आलो आहे. माझे कामासाठी कुठलीही शासकीय फीस लागत नाही.त्यामुळे सदर कर्मचारी चिखले मागत असलेली रक्कम ही लाच असल्याची माझी खात्री झाली आहे.

मी आज दिनांक 09/05/2025 रोजी पंचायत समिती रेणापूर येथील कार्यालयात जावून नरेगा अंतर्गत काम पाहणारे संबंधीत कर्मचारी चिखले यांची भेट घेवून त्यांचेकडे माझे कामासाठी बोलणी करणार आहे. सदर भेटीदरम्यान संबंधीत कर्मचारी चिखले यांनी स्वतः किंवा इतरमार्फत माझे कामाकरीता लाचेची मागणी करून ती स्वतः अथवा इतरामार्फत स्वीकारल्यास त्यांचेवर कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी. सदर कर्मचारी यांचेशी

माझा कसलाही आर्थिक/पैशाची देवाण - घेवाणीचा व्यवहार झालेला नाही अथवा बाकी नाही. त्यांचे व माझे कुठलेही वैर नाही'' अशा आशयाची मी दिलेली तक्रार सापळा अधिकारी पोलीस उपअधीक्षक श्री संतोश बर्गे साहेब व पंचांनी वाचुन पाहुन त्यावर स्वाक्ष-या केल्या आहेत.

त्यानंतर मी पोलीस उपअधीक्षक संतोश बर्गे साहेब यांचे सांगणेप्रमाणे मी लोकसेवक चिखले हे कार्यालयात हजर आहेत अथवा कसे याबाबत माहिती घेतली असता, लोकसेवक चिखले हे दिनांक 09/05/2025 रोजी पंचायत समिती कार्यालयात हजर दिसून आले नाहीत. त्यानंतर सापळा अधिकारी बर्गे साहेब व त्यांचे पथक असे सर्वजण पुढील कार्यवाही दिनांक 13/05/2025 रोजी करण्याचे ठरवुन ला.प्र.वि. कार्यालय, लातूर येथे परत आलो.

दि.13/05/2025 रोजी सकाळी 11.45 वाजता सापळा अधिकारी व सापळा पथक असे श्री. दत्त साधाकाश्रम ध्यान मंदीर,रेणापूर फाटा येथे सापळा कार्यवाही करण्याचे अनुशंगाने आले होते. पोलीस उपअधीक्षक संतोश बर्गे साहेब यांनी मी दिलेल्या तक्रारीच्या अनुशंगाने पंचायत समिती,रेणापूर येथील लोकसेवक चिखले यांनी मला माझ्या वर नमुद कामाकरीता म्हणुन लाचेची मागणी केली आहे अगर कसे? यांची पडताळणी करुन ती ध्वनीमुद्रीत करण्याचे ठरवले. सापळा अधिकारी बर्गे साहेब यांनी त्यांचेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर बाबत मला व पंचांना माहिती सांगुन, ते कोरे असल्याचे खात्री करुन देवुन डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये सिलबंद पाकीटातील नविन कोरे मेमरीकार्ड टाकुन माझे व दोन्ही पंच तसेच पोलीस उपअधीक्षक संतोष बर्गे साहेब यांचे वक्तव्य ध्वनिमुद्रीत करुन पडताळणी करण्याचे ठरवुन सापळा कार्यवाहीबाबत मला व पंचांना तसेच सापळा पथकातील सदस्य यांना योग्य त्या सुचना दिल्या.

त्यानंतर पोलीस उपअधीक्षक संतोष बर्गे साहेब यांनी मला योग्य त्या सुचना देवून पोकॉ/1759 कोंडरे यांचे मार्फतीने 12.43 वा. डिजीटल व्हॉईस रेकॉर्डचे बटण चालु करुन माझ्या गळयात अडकावुन पंचायत समिती , रेणापूर येथे लोकसेवक चिखले बसत असलेल्या कार्यालयात जाण्यास सांगितले. सापळा अधिकारी व सापळा पथक हे श्री. दत्ता साधाकाश्रम ध्यान मंदीर,रेणापूर फाटा येथे मंदीराचे आडबाजुस थांबुन राहिले. त्यानंतर मी व पंच क्रमांक 1 महानुरे असे पंचायत समिती,रेणापूर येथील लोकसेवक चिखले यांचे कार्यालयाजवळ गेलो असता, लोकसेवक चिखले हे कार्यालयात दिसून न आल्याने मी लोकसेवक चिखले यांना फोन करून कोठे आहेत याबाबत विचारणा केली असता थोडया वेळाने समोरून लोकसेवक चिखले कार्यालयाकडे येत असताना दिसले. मी पंच क्र.1 महानुरे यांना ईश-याने सांगून पंचासमक्ष भेट घेतली. लोकसेवक चिखले यांनी माझे वरील नमुद कामाच्या अनुशंगाने पंचासमक्ष माझेशी समोरासमोर चर्चा केली. चर्चे दरम्यान लोकसेवक चिखले म्हणाले... काय झालं रे पैशाचं?...... काय केलं पुन्हा?..... त्यावर मी म्हणालो... आं... हं.....त्यावर लोकसेवक चिखले म्हणाले... काय केलसं पुन्हा?...... आलता ऑफिसला मन की...बाबानं फोन केलता मन की.....त्यावर मी म्हणालो ...ऑनलाईन ... ऑनलाईन नाव एक दुरूस्त...चुकलं....त्यावर लोकसेवक चिखले म्हणाले केलयं दुरूस्त.... सुर्यवंशी झालंत... त्यावर मी म्हणालो ... गोठयांच ... बीलांच ओ....गेल्यावर्षी बजट येवून बी पडलं नाही.... . त्यावर लोकसेवक चिखले म्हणाले.... बजटचं नव्हतं रे वाघा...व्हेरीफीकेशन झालं नव्हंत न... त्यावर मी म्हणालो... आता वाढवून द्यायचं ... वाढवून द्यायचं कधी करतावं?... त्यावर लोकसेवक चिखले म्हणाले... आज... अं..... बोल.... त्यावर मी म्हणालो.... बोला तुम्ही.... कमी जास्त करा की काही... कमी करा तेच्यातले.... त्यावर लोकसेवक चिखले म्हणाले.... दे काय द्यायचेत ते .... देवून जा.... मी करून घेतो..... उग टेंशन देवू नको... त्यावर मी म्हणालो हं.... किती द्यायचेत सांगा की तुम्ही?....त्यावर लोकसेवक चिखले म्हणाले... किती देणार? त्यावर मी म्हणालो.... पंधरा लई होतेत ओ.... त्यावर लोकसेवक चिखले म्हणाले... तुझ्या मनानं देवून जा रे वाघा टेंशन घेवू नको..... बघू पुन्हाचे पुन्हा बील आल्यावर....बील आल्यावर सोडणार नाही.... त्यावर मी म्हणालो... आज होईल का काम मग? त्यावर लोकसेवक चिखले म्हणाले.....शंभर टक्के....त्यावर मी म्हणालो....येवू का मग?....त्यावर लोकसेवक चिखले म्हणाले... कधी येतोस आता?...त्यावर मी म्हणालो ...उद्या.... असे म्हणून मी व पंच क्रमांक 1 महानुरे असे तेथुन निघून बाहेर येवुन सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी 13.09 वाजताचे सुमारास आलो असता पोकॉ कोंडारे यांनी माझेकडील व्हाईस रेकॉर्डर घेवून बंद केले. पोलीस उपअधीक्षक संतोश बर्गे साहेब यांनी माझ्या समक्ष पंच क्रमांक 1 महानुरे यांना लाचेची मागणीच्या अनुशंगाने माझ्यात व लोकसेवक चिखले यांच्यात काय बोलणे झाले? याबाबत विचारणा केली असता पंच क्रमांक 1 महानुरे यांनी मी वर नमुद केल्याप्रमाणे हकीकत सांगितली. आम्ही सर्वानी व्हॉईस रेकॉर्डर हाताळणारे पोलीस कर्मचारी कोंडारे यांचे मार्फतीने डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन माझ्यात व लोकसेवक चिखले यांच्यात झालेले संभाशण ऐकले. सदर संभाषण हे पंच क्रमांक 1 महानुरे यांनी सांगितलेल्या हकीकतीप्रमाणे असल्याचे खात्री करुन लोकसेवक चिखले यांनी माझ्या वर नमुद कामासाठी माझ्याकडे दे काय द्यायचेत ते .... देवून जा.... दे तुला द्यायचे ते दे.... तुझ्या मनानं देवून जा.... असे म्हणून लाचेची स्पष्ट मागणी करून लाचेची रक्कम दिनांक 14/05/2025 रोजी स्विकारण्याचे मान्य केले आहे. परंतू नक्की किती

रक्कम द्यायची याचा उल्लेख न केल्याने लोकसेवक चिखले यांना 12,000/- रूपये देण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले.त्यावरून लाचेची सापळा कार्यवाही दिनांक 14/05/2025 रोजी करण्याचे ठरविले.

दिनांक 14/05/2025 रोजी सकाळी 09.30 वाजता पोलीस उपअधीक्षक संतोष बर्गे साहेब यांनी बोलावले वरून मी श्री.दत्ता साधकाश्रम ध्यान मंदीर,रेणापूर फाटा येथे हजर आलो. माझे कामासंदर्भात व लाचेच्या स्वीकृती संदर्भात माझे व लोकसेवक चिखले यांचेत काय बोलणी होते ते डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत करण्याचे ठरवले. सापळा अधिकारी बर्गे साहेब यांनी त्यांचेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर बाबत मला लाच मागणी पडताळणी प्रमाणे मला व पंचांना माहिती सांगुन, ते कोरे असल्याचे खात्री करुन देवुन डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये सिलबंद पाकीटातील नविन कोरे मेमरीकार्ड टाकुन माझे व दोन्ही पंच तसेच पोलीस उपअधीक्षक संतोष बर्गे साहेब यांचे लाच स्वीकृती सापळा कार्यवाहीबाबत वक्तव्य ध्वनिमुद्रीत करुन सापळा कार्यवाहीबाबत मला व पंचांना तसेच सापळा पथकातील सदस्य यांना योग्य त्या सुचना दिल्या.

पोलीस उपअधीक्षक संतोष बर्गे साहेब यांनी मला लोकसेवक चिखले यांना देण्यासाठी लाचेची रक्कम हजर करणेबाबत कळविले असता मी माझेकडील 500/-रुपये दराच्या 24 भारतीय चलनी नोटा असे एकुण 12,000/- रुपये समक्ष हजर केले. त्यावेळी पोलीस उपअधीक्षक संतोष बर्गे साहेब यांनी मला व पंचाना अॅन्थ्रासीन पावडरचा वापर, गुणधर्म याबाबत माहिती व प्रात्यक्षीक करून दाखविले. मी हजर केलेल्या नोटांना पोकॉ/गंभीरे यांनी अॅन्थ्रासीन पावडर लावुन माझ्या अंगातील शर्टच्या समोरील डाव्या बाजुच्या खिशामध्ये ठेवुन लाचेची रक्कम दिल्यानंतर आपल्या गळ्यातील गमजा काढुन तोंड पुसणे बाबतचा सुनियोजीत ईशारा करणेबाबत सांगण्यात आले. पोलीस उपअधीक्षक संतोश बर्गे साहेब यांनी मला, दोन्ही पंच व सापळा पथकातील सदस्य यांना पुढील सापळा कार्यवाही बाबत पुन्हा सुचना दिल्या. त्यानंतर पोकॉ/1759 कोंडरे यांचे मार्फतीने 10.25 वा. डिजीटल व्हॉईस रेकॉर्डचे बटण चालु करुन माझ्या गळ्यात अडकावुन पंचायत समिती,रेणापूर येथील लोकसेवक चिखले यांचे कार्यालयात जाण्यास सांगितले. सापळा अधिकारी व सापळा पथक पंचायत समिती कार्यालयाच्या आजुबाजुस कोणाच्या नजरेत येणार नाही असे अडबाजुस थांबुन राहिले. त्यानंतर मी व पंच क्रमांक 1 महानुरे असे मिळुन लोकसेवक चिखले यांची पंचायत समिती,रेणापूर येथे भेट घेण्याकरीता गेलो असता लोकसेवक चिखले हे कार्यालयात दिसून न आल्याने मी कार्यालयातील हजर व्यक्तीस लोकसेवक चिखले कधी येणार आहेत? याबाबत विचारणा केली असता त्यांनी लोकसेवक चिखले आले नसलेबाबत सांगितले त्यामुळे मी लोकसेवक चिखले यांना फोन करून ऑफिसला कधी येणार आहेत? याबाबत विचारणा केली असता लोकसेवक चिखले हे दोन दिवस येणार नसुन त्यांनी कॅन्टीनवाला सूरेश यास जावून भेटण्यास सांगितले. त्यावरून मी परत सापळा पथकाजवळ आलो. पोकॉ कोंडरे यांनी माझेजवळील व्हाईस रेकॉर्डर बंद केले त्यानंतर मला विचारपूस केली असता मी त्यांना वरीलप्रमाणे हकीकत सांगितली. परंतू मी लाचेची रक्कम कॅन्टीनवाला सुरेष (ति-हाईत व्यक्ती) यांचेकडे न देता लोकसेवक चिखले याचेकडेच देणेबाबत मत व्यक्त केल्याने पुढील लाच स्वीकृती सापळा कार्यवाही दिनांक 16/05/2025 रोजी करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. सदर सापळा कार्यवाही स्थगीत करून पोलीस उपअधीक्षक बर्गे साहेब यांनी अॅन्थ्रासीन पावडरयुक्त लाचेची रक्कम 12,000/- रुपये ताब्यात घेवून ती एका कागदी लिफाफ्यात टाकून त्यांच्या व दोन्ही पंचाच्या सह्या करून सिलबंद केले तसेच माझे व लोकसेवक चिखले यांच्यात दिनांक 14/05/2025 रोजी सापळा कार्यवाही दरम्यान झालेले संभाशण ध्वनिमुद्रीत करण्याकरीता वापरण्यात आलेले डिजीटल व्हाईस रेकॉर्डर त्यामधील मेमरी कार्डसह एका कागदी लिफाफ्यात त्यांच्या व दोन्ही पंचाच्या सह्या करून सिलबंद केले आहे.

दिनांक 16/05/2025 रोजी सकाळी 10.30 वाजता पोलीस उपअधीक्षक संतोष बर्गे साहेब यांनी बोलावले वरून मी श्री.दत्ता साधकाश्रम ध्यान मंदीर,रेणापूर फाटा येथे हजर आलो. लाच स्वीकृती सापळा कार्यवाही अनुशंगाने लाच स्वीकृती करण्यापुर्वी लोकसेवक चिखले कार्यालयात हजर आहेत अगर कसे? याबाबत तक्रारदार यांनी माहिती घेतली असता लोकसेवक चिखले हे कार्यालयात दिसुन आले नाहीत. तसेच दिनांक 17/05/2025 ते दिनांक 18/05/2025 रोजीपर्यंत दोन दिवस शासकीय सुट्टी असल्याने आज रोजीची सापळा कार्यवाही स्थगीत करून पुढील लाच स्वीकृती सापळा कार्यवाही दिनांक 19/05/2025 रोजी करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले.

दिनांक 19/05/2025 रोजी सकाळी 10.30 वाजता पोलीस उपअधीक्षक संतोष बर्गे साहेब यांनी बोलावले वरून मी श्री.दत्त साधकाश्रम ध्यान मंदीर,रेणापूर फाटा येथे हजर आलो. दिनांक 14/05/2025 रोजीचे सापळा कार्यवाहीनंतर एका कागदी लिफाफ्यात सिलबंद केलेले डिजीटल व्हाईस रेकॉर्डर पोलीस उपअधीक्षक बर्गे साहेब यांनी दोन्ही पंचासमक्ष कागदी लिफाफा फोडून त्यातून व्हाईस रेकॉर्डर बाहेर काढले. लाच स्वीकृती सापळा कार्यवाही अनुशंगाने मला व पंच क्र. 1 महानुरे यांना लोकसेवक चिखले यांच्याकडे लाच स्वीकृती सापळा कार्यवाहीकरीता पाठविण्यापुर्वी लोकसेवक चिखले कार्यालयात हजर आहेत अगर कसे? याबाबत मी यांनी माहिती

घेतली असता लोकसेवक चिखले हे कार्यालयात दिसुन आले नाहीत. लोकसेवक चिखले सध्या कोठे आहेत? याची माहिती घेण्यासाठी मी माझे मो.क्र.9370499089 वरून लोकसेवक चिखले याचा मो.क्र.8623093393 वर 12.24 वाजता फोन केला असता त्यामध्ये लोकसेवक चिखले यांनी "मी सध्या बी.पी.वाढल्याने अॅडमीट असुन उद्या ऑफिसला येणार असल्याचे सांगितले आहे". माझे व लोकसेवक चिखले यांचेमध्ये मोबाईलद्वारे झालेल्या संभाशणावरून लोकसेवक चिखले यांनी मला दिनांक 20/05/2025 रोजी ऑफिसला भेटण्याकरीता बोलाविल्याचे निश्पन्न झाल्याने सदरची सापळा कार्यवाही स्थगीत करून दिनांक 14/05/2025 रोजी व दिनांक 19/05/2025 रोजी सापळा कार्यवाहीदरम्यान झालेले संभाशण ध्वनिमुद्रीत करण्याकरीता वापरण्यात आलेले डिजीटल व्हाईस रेकॉर्डर त्यामधील मेमरी कार्डसह एका कागदी लिफाफ्यात पोलीस उपअधीक्षक बर्गे साहेब यांनी त्यांच्या व दोन्ही पंचाच्या सह्या करून सिलबंद केले आहे.पुढील लाच स्वीकृती सापळा कार्यवाही दिनांक 20/05/2025 रोजी करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले.

आज दिनांक 20/05/2025 रोजी सकाळी 10.30 वाजता पोलीस उपअधीक्षक संतोष बर्गे साहेब यांनी बोलावले वरून मी श्री.दत्त साधकाश्रम ध्यान मंदीर,रेणापूर फाटा येथे हजर आलो. काल दिनांक 19/05/2025 रोजी सापळा कार्यवाहीनंतर एका कागदी लिफाफ्यात सिलबंद केलेले डिजीटल व्हाईस रेकॉर्डर पोलीस उपअधीक्षक बर्गे साहेब यांनी दोन्ही पंचासमक्ष कागदी लिफाफा फोडून त्यातून व्हाईस रेकॉर्डर बाहेर काढले व दिनांक 14/05/2025 रोजीचे सापळा कार्यवाहीनंतर कागदी लिफाफ्यात सिलबंद केलेली अॅन्थ्रासीनं पावडरयुक्त लाचेची रक्कम 12,000/- रुपये पंचासमक्ष कागदी लिफाफा फोडून बाहेर काढून माझे पॅन्टच्या पाठीमागील उजव्या बाजूच्या खिशात ठेवून लाचेची रक्कम दिल्यानंतर आपल्या गळयातील गमजा काढुन तोंड पुसणे बाबतचा सुनियोजीत ईशारा करणेबाबत सांगण्यात आले. पोलीस उपअधीक्षक संतोष बर्गे साहेब यांनी मला, दोन्ही पंच व सापळा पथकातील सदस्य यांना पुढील सापळा कार्यवाही बाबत पुन्हा सुचना दिल्या. त्यानंतर पोकॉ/1759 कोंडरे यांचे मार्फतीने 11.13 वा. डिजीटल व्हॉईस रेकॉर्डचे बटण चालु करुन माझ्या गळयात अडकावुन पंचायत समिती, रेणापूर येथील लोकसेवक चिखले यांचे कार्यालयात जाण्यास सांगितले.सापळा अधिकारी व सापळा पथक पंचायत समिती कार्यालयाच्या आजुबाजुस कोणाच्या नजरेत येणार नाही असे अडबाजुस थांबुन राहिले. त्यानंतर मी व पंच क्रमांक 1 महानुरे असे मिळुन लोकसेवक चिखले यांची पंचायत समिती,रेणापूर येथे कार्यालयात भेट घेण्यासाठी गेलो. तेथे कामाविषयी चर्चा चालू असताना लोकसेवक चिखले यांनी चला चहा घेवू असे म्हणून त्यांचे कार्यालयाचे बाजूस असलेल्या कॅन्टीनमध्ये घेवून गेले. तेथे चर्चेदरम्यान मी म्हणालो.... साहेब ...अं....तुम्ही म्हणल्याप्रमाणं पंधरा हजाराची काय जोड झाली नाही... बारा घेवूनलो....हं.त्यावर लोकसेवक चिखले म्हणाले... हं... लई भाव खायलास... त्यावर मी म्हणालो...उद्या होईल का मंग......वर्क ऑर्डर.....त्यावर लोकसेवक चिखले म्हणाले... उद्या नाही.....परवा दिवषी?...ये ओम ... घेतो रे मी ते करून हं.त्यावर मी म्हणालो.. हो.. हो...असे म्हणुन 500/-रुपये दराच्या 24 भारतीय चलनी नोटा असे एकुण 12,000/-रुपये लोकसेवक चिखले यांचे समक्ष धरले असता, लोकसेवक चिखले यांनी सदर लाचेची रक्कम 11.22 वाजण्याच्या सुमारास पंचासमक्ष उजव्या हाताने स्वीकारून त्यांचे शर्टचे छातीवरील डाव्या बाजूचे खिशात ठेवले. त्यानंतर मी सुनियोजीत लाचस्विकृतीचा इशारा केला. त्यानंतर लगेच सापळा अधिकारी पोलीस उपअधीक्षक संतोष बर्गे साहेब हे पंच क्र. 02 तहाळे व सापळा पथकातील सदस्यासह माझे जवळ आले. माझेकडील व्हाईस रेकॉर्ड पो.कॉ.कोंडरे यांचेकडे दिले ते त्यांनी 11.25 वाजण्याच्या सुमारास घेवुन बंद केले. त्यावेळी सापळा अधिकारी पोलीस उपअधीक्षक संतोष बर्गे साहेब यांनी पंच क्रमांक 1 महानुरे यांना लाचेची रक्कम कोणी स्विकारली? याबाबत विचारणा केली असता पंच क्रमांक 1 महानुरे यांनी समोर हिरव्या रंगाचा फुल बाहयाचा शर्ट व काळ्या रंगाची पॅन्ट घातलेली व्यक्ती हे चिखले असुन त्यांनी मागणी केलेली लाचेची रक्कम पंचासमक्ष उजव्या हाताने स्वीकारून त्यांचे षर्टचे छातीवरील डाव्या बाजूचे खिशात ठेवली आहे. त्यावेळी सापळा अधिकारी पोलीस उपअधीक्षक संतोष बर्गे साहेब यांनी त्यांचेकडील ओळखपत्र लोकसेवक चिखले यांना दाखवून त्यांचे नाव गांव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव ज्योतिर्लिंग बाबुराव चिखले वय 43 वर्ष पद सहायक कार्यक्रम अधिकारी नेमणुक पंचायत समिती,रेणापूर,जि.लातूर रा.अग्रोया नगर,स्वामी समर्थ मंदीराजवळ, लातूर असे असल्याचे सांगितले. पोलीस उपअधीक्षक संतोष बर्गे साहेब यांनी पंच क्रमांक 2 त-हाळे यांचे हस्ते लोकसेवक ज्योतिर्लिंग बाबुराव चिखले, पद- सहायक कार्यक्रम अधिकारी यांच्या जवळील लाचेची रक्कम काढुन घेवुन पंच क्रमांक 1 महानुरे यांचे मार्फतीने सापळा कार्यवाही दरम्यान लिहुन घेण्यात आलेल्या नोटांचे वर्णन व नंबरशी पडताळून पाहीले असता ते एकच असल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर लोकसेवक ज्योतिर्लिंग बाबुराव चिखले यांना ताब्यात घेवुन तेथील आवष्यक ती सापळा कार्यवाही करुन सदर ठिकाणी गर्दी होत असल्याने पुढील कार्यवाही करणेकरीता घटनास्थळावरुन रवाना होवून लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, लातूर येथे येवुन पुढील कार्यवाही पुर्ण केली आहे.

तरी यातील लोकसेवक ज्योतिर्लिंग बाबुराव चिखले वय 43 वर्शे पद सहायक कार्यक्रम अधिकारी नेमणुक पंचायत समिती,रेणापूर,जि.लातूर रा.अग्रोया नगर,स्वामी समर्थ मंदीराजवळ,लातूर यांनी माझे वडील अण्णासाहेब गणपतराव सोमवंशी यांचे नावे मौजे चाडगाव,ता.रेणापुर,जि.लातूर येथील षेत सर्वे नं. 170 मधील शेतामध्ये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत अहिल्यादेवी सिंचन विहीरीसाठी सादर केलेला प्रस्तावामध्ये नविन मजूरी दरानुसार विहीरीचे इस्टिमेट वाढवून देण्याचे कामासाठी तसेच नरेगा साईटवर माझे वडीलांचे आडनावामध्ये सोमवंशी ऐवजी सुर्यवंशी असे चुकीचे नाव झालेले असुन त्यामध्ये दुरूस्ती करण्यासाठी म्हणुन दि.13/05/2025 रोजी पंचासमक्ष दे काय द्यायचेत ते .... देवून जा.... दे तुला द्यायचे ते दे.... तुझ्या मनानं देवून जा.... असे म्हणून लाचेची स्पष्ट मागणी करून 12,000/- रूपये लाचेची रक्कम दि.20/05/2025 रोजी पंचायत समिती,रेणापुर येथील कॅन्टीमध्ये 11ः22 वाजण्याचे सुमारास पंचासमक्ष स्वतः स्विकारली आहे व त्याबाबत कोणतीही पावती दिलेली नाही, म्हणुन माझी त्यांचेविरुध्द कायदेषीर तक्रार आहे.

मी वर नमुदप्रमाणे सांगितलेली तक्रार ही पोकॉ कोंडरे यांनी लॅपटॉपवर टंकलिखीत केली असुन, ती मी वाचुन पाहिली असता मी सांगितल्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष ही फिर्याद दिली.

(संतोष बर्गे)
पोलीस उपअधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

dattatray shivajirao nikam(SI (Sub-Inspector)) / 15101000402dsnm8201s **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): dattatray shivajirao
**Rank**(पद): SI (Sub-Inspector)
**No.**(सं.): 15101000402dsnm820